सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान तसेच कायद्याच्या अन्य कलमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसुलीद्वारे जमा होणारी रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत जमा करण्यासाठी जमेचे नविन लेखाशिर्ष उघडणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः तंबाखू-२०१३/प्र.क्र.२५३/आ-५**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,

मंत्रालय, मुंबई ४०० ००१

तारीख: २ एप्रिल, २०१६

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) मधील नियम ४ व ६ नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास तसेच तंबाखुजन्य उत्पादने विक्रेत्यांनी १८ वर्षाखालील मुलांना सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने विकण्यास आणि शिक्षण संस्थांच्या १०० यार्ड परिसरात सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने विकण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सदर कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून रु. २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) इतका दंड वसूल करण्याची तरतूद आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने प्रसृत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) नियम ४ व ६ चे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसुलीद्वारे जमा केली जाणारी रक्कम राज्याच्या तिजोरीत जमा करुन, सदर रक्कम राज्यात राबविण्यात येणाऱ्या तंबाखू नियंत्रण कार्यक्रमावर खर्च करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्यात सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) नियम ४ व ६ चे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसुलीद्वारे जमा केली जाणारी रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत जमा करण्यासाठी जमेचे नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) नियम ४ व ६ चे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंड वसुलीद्वारे जमा केली जाणारी रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीत जमा करण्यासाठी पुढील प्रमाणे जमेचे नवीन लेखाशिर्ष उघडण्यास या शासन निर्णयाद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| योजनेचे संक्षिप्त नांव : तंबाखू नियंत्रण कार्यक्रम | Scheme Short Title : Prohibition of Smoking |
| विभाग : आर-सार्वजनिक आरोग्य विभाग | Department : R- Public Health Department |
| ०२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य | 0210 Medical and Public health |
| ०४- सार्वजनिक आरोग्य | 04 – Public Health |
| (१०४) फी, दंड इत्यादी | (104) Fees and Fines etc |
| ०१- फी, दंड इत्यादी | 01- Fees and Fines etc |
| (०१)(०४) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाखालील सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास प्रतिबंध, नियमानुसार दंड वसुली | (01)(04) Receipt under Prohibition of Smoking in Public Places Rules for Tobacco Control Activities |
| संकेतांक : (०२१००६७२०१) | Scheme Code : (0210067201) |

केंद्र शासनाने दि. ३० मे, २००८ रोजी प्रसुत केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम तसेच सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा, २००३ (COTPA) च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील विविध शासकीय कार्यालये/सार्वजनिक प्राधिकरणे/रेल्वे कार्यालयातील संबंधीत अधिकारी यांचेवर जबाबदारी सोपविली आहे. सदर प्राधिकृत अधिकाऱ्यांनी उक्त कायद्याच्या उल्लंघनाकरिता केलेल्या दंड वसुलीची रक्कम वरील जमेच्या लेखाशिर्षांतर्गत शासकीय कोषागारात भरणा करावयाची आहे. त्यासाठी सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग-तंबाखू नियंत्रण कार्यक्रम), मुंबई यांनी सदर प्राधिकृत अधिकाऱ्यांना उक्त कायद्याच्या उल्लंघनाकरिता दंड वसुली व कायदेशीर कार्यवाहीसाठी केंद्र शासनाने प्रसृत केलेल्या मार्गदर्शक सुचनेमधील विहित केलेली पावती व चलान उपलब्ध करुन द्यावयाची आहे. (पावती व चलानचा नमुना परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ नुसार सोबत जोडला आहे) शासकीय कार्यालयातील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी विहित नमुन्यातील दंड वसुलीची पावती उपलब्ध नसल्यास शासकीय भरणा करण्यासाठी वापरात असलेल्या नियमित पावतीवर दंड वसुलीसाठी उघडण्यात आलेले लेखाशिर्ष नमुद करुन दंड वसुली करण्यात यावी व सदर दंड वसुलीची रक्कम शासकीय कोषागारात वरील लेखाशिर्षाखाली जमा करावयाची आहे. तसेच प्राधिकृत अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल सोबतच्या परिशिष्ट ‘क’ नुसार सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग-तंबाखू नियंत्रण कार्यक्रम), मुंबई यांना सादर करावयाचा आहे.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ अनौपचारिक संदर्भ क्र.२०३/अर्थ-९, दि.२४.०२.२०१६ तसेच प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई यांनी अनौपचारिक क्र.सं:ख.वि/चा-१/सार्वजनिक आरोग्य विभाग/यूओआर-१६२/२०१४-१५/१००७, दि.३०.१२.२०१४ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४०२११०६४४३२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Sadashiv Brahmane

Digitally signed by Vijay Sadashiv Brahmane
DN: CN = Vijay Sadashiv Brahmane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Desk Officer
Date: 2016.04.02 15:16:08 +05'30'

(वि. स. ब्राह्मणे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सवि/सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई
८. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई.
९. सर्व जिल्हाधिकारी
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
११. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. पोलीस आयुक्त (सर्व)
१४. व्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई.
१५. व्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई
१६. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई
१७. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१९. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.



Scanned by CamScanner

२०. सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग-तंनिका), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२१. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र ½ मुंबई/नागपूर
२२. मा. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½ मुंबई/नागपूर
२३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
२६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२७. जिल्हा शल्य चिकित्सतक (सर्व)
२८. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२९. जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)
३०. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
३१. आरोग्य अधिकारी (सर्व महानगरपालिका)
३२. सर्व जिल्हा परिषदा/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा
३३. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३४. वित्त विभाग (व्यय-१३/अर्थ-०९), मंत्रालय, मुंबई
३५. नियोजन विभाग (का.१४७२), मंत्रालय, मुंबई.
३६. अवर सचिव, (अर्थसंकल्प)/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३७. निवडनस्ती (आरोग्य-५)

Scanned by CamScanner

## परिशिष्ट- अ

क्रमांक :______

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात मनाई आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन आणि वितरण नियमन) कायदा, २००३ (COTPA)

अंमलबजावणी करणारा विभाग : ____________________

सदरिल ठिकाणची दंड पावती_______ दिनांक : ____________

नाव : ______________________________________________________

पत्ता : ______________________________________________________

______________________________________________________

खालील कलमान्वये उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा दिली आहे.

| | |
|---|---|
| • उल्लंघन कलम ४<br>• उल्लंघन कलम ५<br>• इतर कलम | दंड रक्कम<br>रुपये ______________________ |

प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव व पद

प्राधिकृत अधिकाऱ्यांची सही

(जमेचे लेखाशिर्ष “०२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०४-सार्वजनिक आरोग्य, १०४-फी, दंड इत्यादी, ०१-फी, दंड इत्यादी, (०१) (०४) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाखालील सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास प्रतिबंध, नियमानुसार दंड वसुल, (संकेतांक- ०२१००६७२०१)

Scanned by CamScanner

## परिशिष्ट- ब

क्रमांक : ____________ अनुक्रमांक : ________

सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात मनाई आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन आणि वितरण नियमन) कायदा, २००३ (COTPA)

१) आरोपी व्यक्तीचे नांव व पत्ता : __________________________________

__________________________________________________

२) तारीख, वेळ, ठिकाण व गुन्ह्याचे स्वरुप

__________________________________________________

३) अधिनियम/कायदा अंतर्गत गुन्हाशी संबंधीत माहित

__________________________________________________

४) आपल्यावर वर उल्लेखीत गुन्ह्याअंतर्गत खटला भरण्यात आला आहे. तरी आपणास उल्लंघनाबाबत आपले स्पष्टीकरण देण्यासाठी न्यायालयात उपस्थीत रहाणे आवश्यक असून, न्यायालयाचे नाव व पत्ता ______________________________________

____________________________________ठिकाण : ____________

_______ वेळ ___________ दिनांक ___________________________

संबंधीत आरोपीची स्वाक्षरी अथवा

डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा

संबधित प्राधिकरणाचे नाव व पत्ता

Scanned by CamScanner

# परिशिष्ट- ब

## सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात मनाई आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन आणि वितरण नियमन) कायदा, २००३ (COTPA) च्या कलमांचे उल्लंघन व दंड वसुलीच्या रकमेचा त्रैमासिक अहवाल

| अ. क्र. | सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादन कायदा, २००३ | एकूण दंड केलेल्या किंवा चलान फाडलेल्या व्यकतींची संख्या | एकूण दंडाची जमा रक्कम | एकूण दंड केलेल्या किंवा चलान फाडलेल्या व्यक्तींची संख् | एकूण दंडाची जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | महिन्यानुसार | | प्रगती पर (Progressive) | |
| १) | कलम ४ | | | | |
| २) | कलम ५ | | | | |
| ३) | कलम ६ अ | | | | |
| ४) | कलम ६ ब | | | | |
| ५) | कलम ७ व इतर | | | | |
| | एकूण- | | | | |

Scanned by CamScanner